# आत्मचित्र – भाग ४४

(कै. राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून क्रमश)

भारतीय चित्रपटाचे आद्य प्रवर्तक दादासाहेब फाळके यांच्या फिल्म्सचे अवशेष ठेवलेली एक ट्रंक अतिशय धोकादायक अवस्थेत त्यांच्या नातीच्या घरी जतन करून ठेवली होती. नाना प्रयत्न करून ती मिळवून मी स्वत: माझ्या गाडीतून मुंबईहून पहाटे ऊन वाढण्यापूर्वी स्टूडिओमध्ये घेऊन आलो. फिल्म्स ज्वालाग्राही होत्या. जेवढी पॉझिटिव्ह वाचवता येईल तेवढ्या प्रिंटची फिल्म लॅबोरेटरीचे प्रमुख श्री.बेंद्रे यांच्या मदतीनं डुप्लिकेटिंग निगेटिव्ह केली. चित्रपटइतिहासतज्ज्ञ श्री.भास्करराव यांच्या मदतीनं प्रिंटची वर्गवारी करून घेतली. आपण हे अतिशय मोलाचं साहित्य मिळवून, वाचवून आणल्याचं एक कमालीचं समाधान मला मिळालं होतं. पण गंमत अशी, की इतरांच्या लिखाणातून आणि व्याख्यानातून हे साहित्य त्यांनीच कसं मिळवलं, याच्या कल्पित कथा मला वाचायला ऐकायला मिळाल्या. 'सत्य' ही एक अशी गोष्ट आहे, की ती कधीच पुसली जात नाही. असो.

फिल्म इन्स्टिट्यूटसारख्या शिक्षणसंस्थेत इतर प्रोफेसर्समधले मतभेद अतिशय विकोपाला गेले होते. त्यांत विद्यार्थ्यांना हाती धरल्यामुळे परिणामी त्यांच्यातही विसंवाद सुरू झाला.

उत्तरेकडील युनिव्हर्सिटीतून आलेल्या मारी सीटन नामक एक विदुषी, त्यांचे शिष्यगण, परदेशी आणि दुर्बोध फॅशनेबल चित्रांचा गौरव करणारी काही मंडळी होती. बी.आर.चोप्रा, व्ही.शांताराम, बिमल रॉय, के.ए.अब्बास, शक्ती सामंत वगैरे अनेक चित्रपट निर्मात्यांबद्दल अनादरानं बोलणारी, आपल्या भारतीय चित्रपटांबद्दल परकेपणानं बोलणारी मंडळी वाढत चालली होती. चित्रपट व्यवसायातून पाठीशी अनुभूती घेऊन आलेल्या माणसांच्याकडून प्रत्यक्ष शिक्षण, उपयुक्त माहिती जास्त मिळत असे. विद्यार्थ्यांच्याही हे लक्षात येऊ लागलं होतं. यात ऋत्विक घटक, हृषिकेश मुखर्जी यांचं योगदान फार मोठं होतं. संकलनाच्या बाबतीत रामचंद्रन, ध्वनिलेखनाच्या बाबतीत ठकार आणि छायाचित्रणाच्या बाबतीत 'प्रभात'मधले दोन कॅमेरा असिस्टंट्स अप्पा आणि मिरजकर यांच्याकडून विद्यार्थ्यांना खरं मार्गदर्शन मिळालं. कष्ट करून, तपश्चर्या करून उभारलेल्या भारतीय चित्रपट व्यवसायाबद्दलची माहिती आणि आदर निर्माण होणं हे आवश्यक होतं. एक-दोन वर्षं सर्व सुरळीत चाललं होतं. पुढं दुर्दैवानं नेहमी सरकारी कार्यालयातून घडतं तसं अधिकार आणि श्रेय यासाठीचं राजकारण सुरू झालं. परिणामी विद्यार्थ्यांच्यात असंतोष पसरून दुफळी निर्माण झाली. ॲक्टिंग कोर्स बंदच झाला. ही विस्कटलेली घडी आणि प्राध्यापकांच्यातील मतभेद यामुळे एका उत्तम प्रकल्प - संस्थेची प्रगती होईनाशी झाली. मी सुरुवातीला व्हाईस प्रिन्सिपॉल आणि जणू पी.आर.ओ. होतो. चित्रपट व्यवसायातल्या व्यक्तींचा फिल्म इन्स्टिट्यूटशी संबंध आणत राहिलो. चित्रपट व्यवसायातील अनुभवी आणि माझ्या स्नेहातल्या मंडळींना आग्रहानं पुण्याला यायला लावलं. ही मंडळी आल्याचा विद्यार्थ्यांनाही खूप आनंद होत असे. कारण विद्यार्थ्यांना अखेर इंडस्ट्रीत जाऊन प्रत्यक्ष काम करण्याचीच इच्छा असे. अशा संपर्कातून अभिनयाचं तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे कामाच्या संधीही मिळाल्या.

फिल्म इन्स्टिट्यूटमधल्या विद्यार्थ्यांशी आलेल्या संबंधांत प्रकर्षानं आठवणाऱ्या गोष्टी म्हणजे अडूर गोपालकृष्णनची अगदी स्वतंत्र विचारसरणी; तशीच मणिकौल आणि कुमार सहानीचीही. एम. के. नावंदर याचं मानवी स्वभावाचं, संवेदनांचं हालचालींचं निरीक्षण, आणि चंद्रशेखर नायर याचं संगीताचं अन् अनेक भाषांचं ज्ञान. या गोष्टी त्यांच्या स्टूडंट्स एक्सरसाईजेसमधून दिसून येत. सुभाष घई अभिनय शाखेचा विद्यार्थी असूनही त्याला फीचर फिल्म्सबद्दल कमालीची जाण,

कुतूहल होतं, हे चर्चेतून लक्षात येत असे. नावंदर फीचर फिल्म्स् करू लागला असता तर मा.विनायक, राजा परांजपे या घराण्याच्या धर्तीची उत्तम चित्रं त्यानं केली असती; एवढंच नव्हे, तर विषयाची आधुनिक पद्धतीची हाताळणी नवीन तंत्रामुळे तर अधिक उत्तमही करू शकेल, एवढी त्याची गुणवत्ता आहे.

प्रतिष्ठेमागे आणि बढतीमागे लागलेले निव्वळ पोषाखी अधिकारी आणि चित्रपट व्यवसायाचं, कलेचं काम निष्ठेनं जपणारे, यांच्यातील मतभेद हळुहळू वाढू लागले. जगत मुरारी यांनी फिल्म इन्सिट्यूटचा अभ्यासक्रम आणि ॲडमिनिस्ट्रेशनची बाजू संभाळण्याचं फार मोठं काम केलं. परंतु नंतर निर्माण झालेला असंतोष आणि संघर्ष ते आवरू शकले नाहीत. कारण त्यांना कदाचित कुणालाच नाराज करायचं नसावं. प्राध्यापकांच्या, प्राध्यापक विरुद्ध विद्यार्थ्यांच्या आणि विद्यार्थी विरुद्ध विद्यार्थ्यांच्या मतभेदामुळं समस्या निर्माण झाल्या. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमापैकी केल्या जाणाऱ्या छोट्या चित्रपटांमध्ये निरनिराळ्या शाखांचे विद्यार्थी अतिशय खेळीमेळीनं आणि समन्वयानं त्यांच्या जबाबदाऱ्या उत्तम रीतीनं पार पाडत असत, असा श्री. गजानन जागीरदारांचा आणि माझा अनुभव होता. या विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र प्रयोगांच्या देखरेखीची जबाबदारी प्रथम आमच्याकडे असे.

ज्येष्ठ प्रथितयश निर्माते, अनेक कलाकार, अगोदरच्या पिढीतल्या दिग्दर्शकांपासून हृषिकेश मुखर्जींसारखे दिग्दर्शक, ऋषितुल्य तपश्चर्या केलेले छायाचित्रकार, ध्वनिलेखक अशी बरीच मंडळी फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये वरचेवर येऊ लागली. सतीश बहादूर, रोशन तनेजा या व्यक्तींनी जीव ओतून काम केलं. विद्यार्थ्यांना परदेशी आणि भारतीय चित्रपट माध्यम आणि व्यवसायाचा परिचय होऊ लागला, फायदा होऊ लागला होता. निर्माते, दिग्दर्शक, कलाकार यांच्या भेटी होऊ लागल्या. त्याचा व्यवसायातल्या मंडळींना खूप आनंद होत असे. श्री.ऋत्विक घटक यांच्यासारखी व्यक्ती पुढं विद्यार्थ्यांना प्राध्यापक म्हणून मिळाली, ही विद्यार्थ्यांच्या भाग्याची गोष्ट. श्री.घटक काही दिवस प्रथम गेस्ट लेक्चरर म्हणून येत असत. नंतर ते व्हाईस प्रिन्सिपॉल आणि दिग्दर्शनाचे प्राध्यापक झाले. त्यांचं आणि माझं खूपच मित्रत्व जमलं. त्यांची जवळजवळ सारी चित्रं मी पाहिली आहेत. मी त्यांचा घनिष्ट मित्र आणि भक्तही. त्यांची संगीताची जाण आणि बंगाली लोकगीतांचं भांडार ही तर कुणालाही भारावून टाकतील अशी वैशिष्ट्य होती. पुढं कितीतरी विद्यार्थी फिल्म इन्स्टिट्यूटला खूप मोठं श्रेय देऊन राहिले आहेत. मला फिल्म इन्स्टिट्यूटचं काम खूप आवडलं होतं, परंतु मानवनिर्मित तणावाच्या वातावरणाचा मला उबग आला. शिवाय चित्रपट दिग्दर्शित

करत राहण्याची माझी इच्छा बळावत होतीच. १९६४च्या सुमारास फिल्म इन्स्टिट्यूट सोडायचं मी ठरवलं.

पुढं भविष्यात साऱ्या विसंगती निवळून फिल्म इन्स्टिट्यूट ही 'प्रभात फिल्म कंपनी'च्या जागेवर उभी राहिलेली एक उत्तम आधुनिक, आदर्श संस्था होऊन राहिली आहे, आशियातील सर्वोत्तम संस्था म्हणून गणली गेली आहे. त्या संस्थेच्या जोडीला नॅशनल फिल्म आर्काईव्हज् या संस्थेनं तर फार मोठा आधार दिला आहे. या संस्थांच्या उभारणीत आणि विकासात श्री. जगत मुरारी आणि श्री. पी.के.नायर यांचं फार मोठं योगदान आहे. इथून तयार होऊन बाहेर पडलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांनी तर एफ.टी.आय.आय.ला गौरव मिळवून दिला आहे. अशा संस्थांच्या कामात आपण संबंधित होतो याचा मला अतिशय आनंद आहे.

फिल्म इन्स्टिट्यूटच्या या वातावरणाचा आणि माझ्या व्यक्तिगत नव्हे; पण एकंदर निरीक्षणाचा मुळीच उल्लेख न करता, 'मला दिग्दर्शक म्हणून चित्रपट करण्याची इच्छा आहे. त्यासाठी मी फिल्म इन्स्टिट्यूट सोडत आहे', असंच माझ्या राजीनाम्यात लिहिलं होतं. त्यावेळी इंदिरा गांधी या माहिती-नभोवाणी मंत्रालयाच्या मंत्री होत्या. मी संस्था का सोडत आहे, अशी त्यांनी आस्थेनं अप्रत्यक्ष चौकशी केली. राजीनाम्याला मान्यता मिळाली; परंतु प्रत्यक्ष कॉन्व्होकेशन होईपर्यंत पुढं काही दिवस मला राहावं लागलं. कॉन्व्होकेशनसाठी श्रीमती गांधींना इन्स्टिट्यूटमध्ये घेऊन येणं, विद्यार्थ्यांच्या शूटिंगचं प्रात्यक्षिक दाखवणं हे काम माझ्याकडं होतं. आम्ही पुण्यात 'संगम व्हिज्युअल सोसायटी' असा मुलांना उत्तम चित्रं दाखवण्याचा एक प्रकल्प चालवीत होतो. वाटेत सारा वेळ त्याबद्दल बोलणं चाललं होतं. त्यांना या प्रयत्नांबद्दल खूप आनंद झाला. पुढं 'केसरी' या वृत्तपत्राच्या शताब्दीच्या वेळी मी 'शतायू केसरी' म्हणून एक अनुबोधपट महाराष्ट्र शासनासाठी केला होता. त्यावेळी त्यांच्या हातून मला पारितोषिक मिळालं होतं. त्यावेळी त्यांची पुन्हा भेट झाली होती.

या साऱ्या काळातला चित्रपट अध्ययन क्षेत्रातला अनुभव आणि कमालीचे प्रतिभावंत दिग्दर्शक ऋत्विक घटक यांचं मित्रत्व ही माझी खरी कमाई. आता पुन्हा एफ.टी.आय.आय.मध्ये ॲक्टिंग कोर्स नसिरूद्दिन शहांसारख्या कलाकारांच्या नेतृत्वाखाली चालू झाला आहे, ही अतिशय समाधानाची गोष्ट.

– कैः. राम गबाले

('आत्मचित्र' पु स्तकासाठी भारतातील सं पर्कः – अरुण जाखडे – २५४४२४५५)